वसई विरार शहर महानगरपालिका,डेएनयुएलएम विभाग

जाहीर प्रकटन

जा.क्र.वविशम/डेएनयुएलएम/१३८/2026-27 दिनांक२८/१०/202६

संदर्भ- 1) केंद्र सरकारचा पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन अधिनियम ,2014
2) महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम,2016

उपरोक्त संदर्भ क्र.1 मधील तरतुदीची अंमलबजावणी करण्याबाबत वसई विरार शहर महानगरपालिका पथविक्रेता समिती गठीत करण्यासाठी पथविक्रेता नियम 2016 मधील प्रकरण चार मधील कलम 11 व 12 नुसार 11 (2) (ख) इतर मंडळातील (दोन) ते (पाच) या प्रवर्गातील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी खालील संघटीत संस्था/संघ यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

इतर मंडळे प्रवर्ग	सदस्य संख्या
(तीन) निवासी कल्याण संघ	2
(चार) व्यापारी संघ	1
(पाच) पणन संघ	1

नगर पथविक्रेता समितीच्या नामनिर्देशित सदस्यांसाठी किमान अर्हता:

1) अर्जदाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी नसावे.
2) अर्जदार हा वसई विरार शहर महानगरपालिका करांचा थकबाकीदार नसावा.
3) अर्जदारास न्यायालयाने कोणत्याही गंभीर गुन्ह्यात शिक्षा ठोठावलेली नसावी. याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.
4) संघटना किंवा संघाची संबंधित क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी झालेली असावी.
5) संघटना किंवा संघ यांनी मागील तीन वर्षे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरिक्षण अहवाल सादर करावेत.
6) संघटना किंवा संघ यांना स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.
7) संघटना किंवा संघ त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत. याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.
8) संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेल्या त्याच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.

उपरोक्त अर्हता धारण करीत असलेल्या इच्छुक संघटना किंवा संघ यांचेकडून नगर पथविक्रेता समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी आवश्यक त्या संबंधित कादपत्रासह कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत.

उपरोक्त संघटना किंवा संघ यांचेकडून निवड करावयाच्या सदस्य संख्येपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास नमूद नियमांनुसार सदस्य नियुक्ती करण्यात येईल.

शासन निर्णय व संबंधित अधिनियम तसेच अटी-शर्ती व नियम हे संस्था/संघ यांना पाहण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिका येथे कार्यालयीन वेळेत (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळुन) उपलब्ध राहतील.

सदरील जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून 15 दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत विहीत नमुन्यात अर्ज सादर करावेत. कार्यालयीन वेळेनंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(**टीप-** सदर इच्छूक संस्था/संघ यांचेकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या वेबसाईटवर विहित नमुन्यात अर्ज उपलब्ध आहेत.)

(भारत मराठे)
उपआयुक्त (करारसेवा),
फेरीवाला धोरण अंमलबजावणी
वसई विरार शहर महानगरपालिका

अर्ज पाठवावयाचा पत्ता:-

मा.आयुक्त,वसई-विरार शहर महानगरपालिका,
नविन प्रशासकीय इमारत,यशवंत नगर,विरार (पश्चिम),
तालुका-वसई, जिल्हा-पालघर, पिन-४०१३०३

वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार (पश्चिम)

नगर पथ विक्रेता समिती सदस्याकरीता अर्ज

फोटो

[महाराष्ट्र पथविक्रेता (उपनिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण चार नियम ११ च्या पोटकलम (४) (५) आणि नियम १२.]

१)	संघाचे नांव	:- ______________________
२)	संघाचा नोंदणी क्रमांक व दिनांक	:- ______________________
३)	अर्जदाराचे पूर्ण नांव	:- ______________________
४)	वय	:- ______________________
५)	व्यवसाय / धंदा	:- ______________________
६)	संपूर्ण पत्ता (उमेदवाराने आपला पोष्टाचा पत्ता नमुद करावा)	:- ______________________ ______________________
७)	संघावरील कामाचा अनुभव	:- ______________________
८)	शिफारस करणाऱ्या संघाच्या पदाधिका-याचे नांव, पदनाम, व स्वाक्षरी.	:- ______________________ ______________________

<u>अर्जदाराचे करावयाचे घोषणापत्र</u>

मी याद्वारे घोषित करतो/करते की, मी श्री/श्रीमती ______________________, नगर पथ विक्रेता समितीवर सदस्य म्हणून काम करण्यासाठी संमती देत आहे. मी असेही घोषित करतो की,

१) माझ्या वयाची ___________ वर्षे पूर्ण झाली आहेत.

२) महानगरपालिकेस देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी माझे नांवावर शिल्लक नाही.

३) मला न्यायालयात कोणत्याही गंभीर गुन्हयात शिक्षा झालेली नाही. याबाबत प्रतिज्ञापत्र जोडले आहे.

४) मी वेळोवेळी शासनाचे नियमांचे पालन करीन.

५) संघाची सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असल्याचा दाखला जोडला आहे.

६) संघाच्या मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरिक्षा अहवाल सोबत जोडला आहे.

७) संघाच्या सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गाधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेबाबतचा दाखला जोडला आहे.

८) संघटना किंवा संघ यांना स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.याबाबत प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे.

दिनांक.   /   /२०२६

अर्जदाराची सही किंवा अंगठा

(अर्जदाराने रहिवास पुरावा म्हणून रेशनकार्ड/आधारकार्ड/बँकेचे पासबुक पहिले पान/लाईटबील (अदयावत)